Vol II Issue IX

ISSN No : 2230-7850

Monthly Multidiciplinary
Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume1, Issue. 7, Aug 2011
ISSN:-2230-7850

Available on all social networks
citeulike

ORIGINAL ARTICLE

# नळदुर्ग किल्याचे ऐतिहासिक महत्त्व

**सुर्यवंशी डी. व्ही.**

इतिहास विभाग,
सहकारभूषण एस्.के.पाटील महाविद्यालय,
कुरूंदवाड

**प्रस्तावना**

नळदुर्गचा किल्ला हा उस्मानाबाद ऊर्फ धाराशिव जिल्हयात आहे. उस्मानाबाद पासून हा किल्ला 58 कि.मी लांब आहे. हा किल्ला भूईकोट प्रकारातील आहे. हा किल्ला 115 एकर इतक्या विस्तीर्ण जागेत वसलेला आहे. किल्ल्याचा परीघ सुमारे 2 कि.मी इतका आहे. या किल्ल्याला सर्व बाजुंनी तटबंदी असल्याने हा किल्ला जिंकणे कठीण आहे. या तटाला एकूण 114 बुरूजांची जोड दिल्याने हा किल्ला अनेक 'बुरूजांचा स्वामी' म्हणून ओळखला जातो.

कल्याणीच्या चालुक्य राजाने या किल्ल्याची बांधणी केली. पण त्याच्या काळात त्याने तो केवळ मातीचा बांधला म्हणून, चालुक्य काळात हा किल्ला केवळ मातीचा होता. चालूक्य नंतर या प्रदेशात बहामनी सत्ता प्रस्तापित झाली. बहामनी सुलतानानी त्याचे महत्त्व ओळखले. या मातीच्या किल्ल्याचे रूपांतर दगडी बांधकामात करण्यात आले. सन 1361–1480 या काळात या किल्ल्याची पुर्नबांधणी करण्यात आली. मातीची जागा दगडांनी घेतली आणि पूर्वीपेक्षा नळदुर्गचा किल्ला हा भरभक्कम बनला. या किल्ल्याचे प्रवेशव्दार पश्चिमाभिमुख आहे मुख्य व्दाराच्या दोन्ही बाजूना बुरूंजामुळे या दरवाजाला मोठे संरक्षण प्राप्त झाले आहे. या किल्ल्याला अनेक दरवाजे आहेत मुख्य दोन व इतर दरवाजे आहेत. पहिला 'हुलमुख' दरवाजा आहे 'गोलंबार' दरवाजा हा किल्ल्यातील दुसरा दरवाजा होय. हा दरवाजा भव्य असून त्याला अणुकुचीदार खिळे लावले आहेत. या शिवाय 'हत्ती' दरवाजा,' पाणी' महल दरवाजा, 'सदर' दरवाजा, 'कोटी' दरवाजा असे अनेक दरवाजे या किल्ल्यात आहेत.

नळदुर्गचा किल्ला हा प्राचीन किल्ला म्हणून गणला जातो. हा किल्ला चालुक्य कालीन असून याची उभारणी चालुक्य काळात झाली. चालुक्याची सत्ता संपुश्टात आल्यानंतर हा किल्ला बहामनी सम्राटाच्या ताब्यात गेला. मोगल काळात औरंगजेब दक्षिणेत आला त्यावेळी त्याचे लक्ष्य या किल्ल्याकडे गेले. आणि इ.स 1680 मध्ये त्याने हा किल्ला जिंकून घेतला. नंतर हा किल्ला मोगल साम्राज्याचा एक भाग बनला. नंतर हा किल्ला विजापूरच्या आदिलशहाने इ.स 1681 मध्ये जिंकून घेतला. आदिलशहाच्या काळातल्या किल्ल्याचे नाव बदलून शहादुर्ग असे ठेवण्यात आले. मोगल सरदार बहादूरखान दिलेरखान या दोघांनी नळदुर्ग किल्ला जिंकण्याची एक योजना आखली. त्यावेळी नळदुर्गच्या किल्ल्यातील किल्लेदार खिजरखान पन्नी यांची मुले होती, त्याच्या पासून किल्ला जिंकून घेण्यासाठी मोगलाचा सरदार बहादूरखान याने ऑगस्ट 1676 मध्ये नळदुर्ग किल्ल्याला वेढा दिला. त्यावेळी नाशिक येथे  इंद्रमन बुंदेला होता. बहादूरखानाने आपल्या मदतीसाठी नळदुर्ग येथे बोलावून घेतले. नळदुर्गला मोगलांनी वेढा घातला आहे हे त्याला लक्षात येताच विजापूरहून मोगलाचा प्रतिकार करण्यासाठी विजापूरच्या सुलतानाने अब्दुलकरीम बहलोलखान याला नळदुर्गकडे पाठविले. अब्दुलकरीमवर चालून जावे की, नाही याबाबत बहादूरखानाने दिलेरखान व इतर मोगल सरदाराशी सल्लामसलत करून विजापूरच्या लश्करावर हल्ला करण्याचे ठरविले. पण त्याच वेळी त्याने एका नवीन युक्तीचा वापर केला. त्याने सर्व सैन्य रणागणात न उतरवता काही अफगाण सरदाराची फलटण राखून ठेवली. ही फलटण त्याने किल्ल्याच्या बाजूने पाठविली, आणि किल्ल्यातील व किल्ल्या बाहेरील दोन्ही तुकडया एक झाल्या, आणि त्यांनी मोगलांच्या सैन्यावर पिछाडीने वार सुरू केले. या पिछाडीच्या वाराने मोगल सैन्यात गोंधळ सुरू झाला. या युध्दात मोगलांच्या बाजूने भोजराज कछवाह आणि रघूनाथसिंह हे मराठे सरदार लढत होते. यात भोजराज कछवाह मारला गेला आणि रघूनाथ व त्याच्या सैन्यातील अनेक जण जखमी झाले. विजापूरचे सरदार अब्दूल करीम बहलोलखान याने या युध्दात मोगलांना पळवून लावले, आणि तो तडक नळदुर्ग किल्ल्याजवळ पोहचला. भिमसेन सक्सेना हा लेखक आपल्या 'तारिखे दिल्खुशा' या ग्रंथात लिहितो की आमच्या आणि बक्षीच्या खात्याचे सर्व सामान विजापूरच्या सैन्याने लुटले यावरून मोगल सैन्याची नळदुर्गच्या युध्दात चांगलीच हानी झालेली दिसते.

मोगलाच्या ताब्यात हा किल्ला असताना छत्रपती संभाजीच्या सैन्याने नळदुर्गच्या किल्ल्यावर हल्ला केल्याची माहिती औरंगजेबाच्या पार्शियन कागदपत्रात आढळते. सरदार मानकोजी बल्लाळ हा छत्रपती संभाजी महाराजांचा एक सरदार होता. त्याने फेब्रुवारी 1683 मध्ये 5,000 सैन्यानिशी नळदुर्गावर हल्ला केला. किल्ल्याला वेढा घालणे अशक्य होते. कारण – सरदार मानकोजी बल्लाळजवळ सैन्य व लश्करी साहित्य नव्हते. सरदार बल्लाळने किल्ल्यावर आक्रमण करून किल्ला लुटणे आणि मोगलांना जरब बसविणे या उद्‌देशाने या किल्ल्यावर आक्रमण केले. त्यावेळी किल्ल्यावर कासीमखान नावाचा किल्लेदार होता. सरदार मानकोजी बल्लाळ याने एवढया तीव्रतेने हल्ला केला की, मोगल किल्लेदार कासिमखान घाबरून किल्ल्यातून बाहेर आला. यावेळी मराठयांचा युध्द जिंकणे हा उद्‌देश नसून मोगल सैन्याची दाणादाण उडवून त्याना हैराण करणे व त्याच्यावर जरब बसविणे हाच त्याचा उद्‌देश होता.

2 जानेवारी 1758 रोजी मराठयांनी हा किल्ला हैदराबादच्या निजामाकडून जिंकून घेतला. व या किल्ल्यावर मराठयांची सत्ता प्रस्थापित झाली.

नळदुर्ग किल्ल्याच्या परिसरात अनेक इमारती आहेत. त्यापैकी अनेक इमारती पडझड झाालेल्या अवस्थेत  आहेत. तर काही नश्ट होण्याच्या मार्गावर आहेत. नळदुर्ग किल्याचे वैशिश्टय म्हणजे या किल्ल्यातील काही आकर्शक वास्तू हे होय. या किल्ल्याच्या तर परिसरात जामा मशीद , पाणी महल, रंगमहल, मछली तलाव, पाण चक्की, अंबरखाना, बारूदखाना, तुरूंग, टेलर कोटी अशा वास्तू आहेत.

**किल्ल्यातील महत्त्वाच्या वास्तु :**
**पाणीमहल :**

**Please cite this Article as :**सुर्यवंशी डी. व्ही. , नळदुर्ग किल्याचे ऐतिहासिक महत्त्व: **Indian Streams Research Journal (Oct ; 2012)**

नळदुर्ग किल्ल्यातील सर्वात मोठे वैशिश्टय म्हणजे 'पाणीमहल' होय. या किल्ल्यातील अत्यंत आकर्शक वास्तू म्हणजे पाणी महल. तुळजापूरहून बोरी नदी वाहते. मध्ययुगीन राज्यकर्त्यानी बोरी नदीच्या पात्राजवळून दुस-या आदिलशहाच्या काळात एक बंधारा बांधून या नदीचे पाणी अडविण्यात येवून त्याचा वापर किल्ल्यातील पाणीमहल इमारतीसाठी करून घेण्यात आला. इ.स 1557 मध्ये नळदुर्ग किल्ल्यात पाणीमहलची इमारत उभी राहिली. त्यासाठी मिर इमादिनने बोरी नदीचे पाणी किल्ल्याकडे वळविले. त्यासाठी त्याने 174 मीटर लांब, अडीच ते चौदा मीटर रूंद आणि एकोणीस मीटर उंचीचा बंधारा बांधला. नदीला जेव्हा पाणी येते तेव्हा ते या बंधा-यात साठते आणि बंधा-यातील पाण्याचा प्रवाह या इमारतीवरून वाहू लागते. पण ते पाणी वाहत असताना इमारतीच्या कोणत्याच आतील भागाला या पाण्याचा स्पर्श होत नाही हे विशेश होय. या पाणी महलात उतरल्या नंतर पश्चिम बाजूच्या भितीवरील 'फारशी शिलालेख' आपले लक्ष वेधून घेतो.

**उपळया बुरूज (उपली बुरूज) :**

या किल्ल्यातील पाहण्यासारखे आणखी एक आकर्शण म्हणजे 'उपळया बुरूज' होय. याला 'उपली बुरूज' असे ही म्हणतात. हा किल्ल्याच्या सपाट मैदानावर बांधलेला असून तो दिडशे फूट उंच आहे. या बुरूजावरून जाण्यासाठी सुमारे 78 पाय-या आहेत. या बुरूजाच्या माथ्यावरून टेहळणी करता येते. म्हणून याला 'टेहळणी बुरूज' असे म्हणतात.
उपली याचा अर्थ शेणाच्या गोव-या. हा बुरूज तयार करताना मध्यभागी शेण्याच्या गोव-या वापरल्या जेव्हा हा बुरूज तयार झाला तेव्हा बुरूजाच्या मध्यभागी रचलेल्या शेणाच्या गोव-या काढून घेतल्या. मध्य युगात स्थापत्य शास्त्रात अशा गोव-याचा उपयोग मोठया प्रमाणात करत असत. येथे छत टाकताना गोव-याचा वापर केला म्हणून या बुरूजाला 'उपली बुरूज' असे म्हणतात.

**किल्लेदाराचा वाडा :**

या किल्ल्यात किल्लेदाराचा वाडा म्हणून एक वास्तू आढळते. पूर्वी या वास्तूमध्ये नळदुर्गचे महाविदयालय भरत असे या वास्तूच्या उजवीकडे जामा मशीद आहे. याच इमारतीच्या शेजारी लागून मुन्सीफ कोर्ट नावाची इमारत आहे. ती इ.स 1932 मध्ये बांधल्याचा इमारतीवर शिलालेख आहे.

**नऊ बुरूज :**

किल्लेदाराच्या वाडयाच्या उजव्या बाजूला एकात एक असे नऊ बुरूज असणारी एक वास्तू आहे, त्यास नवबुरूज असे म्हणतात. नऊबुरूज आहे. ही नऊबुरूज ही वास्तू या किल्ल्याचे नाविन्यपूर्ण वैशिश्टय असून तो दुमजली आहे.

**रंगमहल :**

किल्लात उजव्या बाजूला आणखी एक इमारत उद्ध्वस्त अवस्थेत आहे. या इमारतीच्या केवळ भिंती उभ्या आहेत. बाजूला सर्वत्र गवत वाढले आहे. ही इमारत बरीच मोठी असून पसरट आहे. ती इमारत रंगमहल या नावाने ओळखली जाते.

**निष्कर्श :-**

महाराश्ट्रातील – उस्मानाबाद जिल्हयापासून 58 किमी अंतरावर असणारा भुईकोट प्रकारातील किल्ला म्हणजेच नळदुर्गचा किल्ला. 115 एकराच्या जागेत 2 कि.मी परीघाने वेढलेले व 114 बुरूजांचा असणारा हा किल्ला अनेक वैशिश्टयांनीयुक्त आहे. यामध्ये पाणी महल, उपळया बुरूज, किल्लेदाराचा वाडा, नऊ बुरूज रंगमहल अशी वैशिश्टय सांगता येतील. या किल्ल्याची सर्वात महत्वाचे वैशिश्टय म्हणजे किल्ल्याचा प्रवेशद्वार जवळील असणा-या दोन मोठया बुरूजामुळे शत्रुला सहजासहजी प्रवेश करणे शक्य होत नव्हते. चालुक्याचा काळात बांधलेला किल्ला नंतर बहामनी सुलतानानी घेतला. त्यानंतर 1361 ते 1480 या काळात किल्ल्याची पुर्नबांधणी झाली. बहामनी नंतर 1680 मध्ये औरंगजेबने हा किल्ला आपल्या ताब्यात घेतला नंतर तो आदिलशहाने जिंकून घेतला. त्यानंतर 2 जानेवारी 1758 रोजी मराठयांनी हैदराबादच्या निजामाकडून हा किल्ला जिंकून घेतला व मराठयांची सत्ता या किल्ल्यावर प्रस्थापित झाली. ऐतिहासिक दृश्टया या किल्ल्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**संदर्भ सुची :-**


1)नळदुर्ग किल्ला, राज्य संरक्षक स्मारक, महाराश्ट्र शासन पुरातत्त्व विभाग, औरंगाबाद, 2006.
2)पाठक अरूणचंद्र, महाराश्ट्र राज्य गॅझेटिअर, इतिहास प्राचीन कालखंड, महाराश्ट्र शासन, मंबई, 2002.
3)चौबळ ज.स., असे होते मोगल, महाराश्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मंबई, 1974.
4)शेजवळकर त्र.श., निजाम – पेशवे संबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, 1963.
5)शेडे सोमनाथ (संपा), मराठवाडा इतिहास परिशद, निवडक शोध निंबध.
6)उस्मानाबाद जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, महाराश्ट्र शासन मंबई, 1991, 2001.
7)चौधरी की.बा,महाराश्ट्र राज्य गॅझेटिअर दर्शणीका विभाग, महाराश्ट्र शासन मंबई, 1996.
जोशी अ.ग.(संपा) मराठवाडा संशोधन मंड

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net